निरीक्षक चौकशी क्रमांक : ५/२०१२, /२०१२,
१४७/२०१५ व १४८/२०१५

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

अंधश्रध्दा निमुर्लन समिती ( महाराष्ट्र) सातारा
नोंदणी क्र.ई-४६१-सातारा या न्यासाबाबत . .

शासकीय माहिती अधिकारी
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
सातारा विभाग सातारा

## निरीक्षक चौकशीचा एकत्रित अहवाल

सविनय सादर,

(१) उपरोक्त संदर्भातील न्यासाबाबत श्री. सुधांशु जोशी रा. डोंबीवली जि. ठाणे यांनी दिनांक १३/२/२०१२ रोजी तक्रार अर्ज दाखल केलेला असून त्यावरील मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सातारा यांचे आदेशानुसार सदरचा तक्रार अर्ज चौकशी करुन अहवाल सादर करणेकरिता निरीक्षकाकडे सूपूर्द करणेत आलेला असल्याने त्यास निरीक्षक चौकशी क्रमांक ५/२०१२ असा देणेत आला आहे.

२) श्री. ह. भ. प. बापू महाराज रावकर रा. नागोठाणे, ता. रोहा, जि. रायगड यांनी महाराष्ट्र शासनाचे विधी व न्याय विभाग, मंत्रालय मुंबई तसेच मा. धर्मादाय आयुक्त, ८ महा. राज्य, मुंबई यांचेकडे दाखल केलेले तक्रार अर्ज या कार्यालयास प्राप्त झालेनंतर त्यावरील मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सातारा यांचे आदेशानुसार सदरचा तक्रार अर्ज चौकशी करुन अहवाल सादर करणेकरिता निरीक्षकाकडे सूपूर्द करणेत आलेला असल्याने त्यास निरीक्षक चौकशी क्रमांक १२/२०१२ असा देणेत आला आहे.

३) श्री. सतीश र. सोनार हिदु जनजागरण समिती, ठाणे यांनी विधी व न्याय विभाग, मंत्रालय मुंबई व मा. पर्यावरण मंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे दाखल केलेले तक्रार अर्ज मा. धर्मादाय आयुक्त, मुंबई यांचेकडील पत्र क्र. जे-१/१८१/१५ दिनांक १२/६/२०१५ अन्वये दिनांक २४/६/२०१५ रोजी प्राप्त झाले. त्यावरील मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सातारा यांचे आदेशानुसार सदरचा तक्रार अर्ज चौकशी करुन अहवाल सादर करणेकरिता निरीक्षकाकडे सूपूर्द

करणेत आलेला असल्याने त्यास निरीक्षक चौकशी क्रमांक १४७/२०१५ असा देणेत आला आहे.

४) श्री. सुनील घनवट, राज्य संघटक, हिंदू जनजागरण समिती यांनी मा. मुख्यमंत्री व मा. पर्यावरण मंत्री महाराष्ट्र राज्य यांना तक्रार स्वरुपात दिलेले निवेदन मा. धर्मादाय आयुक्त, मुंबई यांचेकडील पत्र क्र. जे-१/१६७/२०१५ अन्वये दिनांक २४/६/२०५ रोजी प्राप्त झाले. मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सातारा यांचे आदेशानुसार सदरचा तक्रार अर्ज चौकशी करुन अहवाल सादर करणेकरिता निरीक्षकाकडे सूपूर्द करणेत आलेला असल्याने त्यास निरीक्षक चौकशी क्रमांक १४८/२०१५ असा देणेत आला आहे.

उपरोक्त चारही तक्रार अर्ज व निवेदनामधील तक्रारींचा आशय व स्वरुप हे एकाच न्यासाबाबत सर्वसाधारणपणे सारखे असल्याने चारही तक्रार अर्जाबाबतचा एकत्रित अहवाल सादर करणे यथोचित वाटते. तक्रारदारांचे तक्रारींचे स्वरुप थोडक्यांत खालील प्रमाणे असल्याचे दिसून येते:-

(अ) न्यासाचे स्थापनेपासूनचे विश्वस्त बदलाबाबतचे बदल अहवाल त्यात्यावेळी दाखल करणेत आलेले नाहीत. तसेच बदल अर्ज हे न्यासाच्या विश्वस्तांनी विलंबाने तसेच कागदपत्रे नंतर तयार करुन दाखल केलेले आहेत.

(ब) सन १९९२ ते २००२ या काळातील हिशोबाचे ऑडीट केलेले नव्हते. सदरचे ऑडीट नंतर करुन घेवून ऑडीट रिपोर्ट विलंबाने दिनांक १९/९/२००३ रोजी सादर केलेले आहेत. तसेच० सन २००३ व २००४ सालचे ऑडीट रिपोर्ट हे दिनांक ५/३/२००४ रोजी सादर केले आहेत. सन २००५ सालातील ऑडीट रिपोर्ट सादर केलेले नाहीत.

(क) प्रत्येक वर्षाचे ऑडीट रिपोर्टमधील अंशदानास पात्र उत्पन्न असताना तसेच अंशदानातून सूट अथवा अंशदान भरणेस मुभा नसतानाही बेकायदेशीररित्या ऑडीट विलंबाने सादर करुन अंशदान भरणेत आलेले नाही.

(ड) सन २००४ पासून पुढील कालावधीत न्यासाच्या उत्पन्नात वाढ झालेली असून न्यासाने कित्येक कोटी रुपयांच्या ठेवी ठेवलेल्या आहेत. तसेच न्यासाकडे परदेशामधून पैसा येवूनसुध्दा वेळेवर हिशोब पत्रके सादर केलेली नाहीत.

(इ) संस्थेचे कार्य हे सामाजिक व शैक्षणिक दाखविणेत आलेले असले तरीही न्यासाच्या विश्वस्तांचे नक्षलवादी संघटनांशी संबंध आहेत.

(ई) न्यासाने सन २००४ पासून नियमकालीका वार्तापत्र, मुखपत्र तसेच २००४ ते २०१० पर्यंत वृत्तपत्र प्रसारित केलेले आहे मात्र नोंदणी कार्यालयाकडे (आरएनआय) वार्षिक अहवालाची प्रत एकदाही सादर केलेली नाही. तसेच महाराष्ट्र अंधश्रध्दा निमुर्लन समिती हा नोंदणीकृत न्यास व त्यांचे अंधश्रध्दा निमुर्लन वार्तापत्र मासिक प्रकाशक व मालक एकच असल्याचे नियतकालिकावरुन दिसून येते. मात्र त्याचा उल्लेख न्यासाच्या हिशोबपत्रकामध्ये नमूद असल्याचे दिसून येते.

(ग) न्यासाने महाराष्ट्र अंधश्रध्दा निमुर्लन समिती संचलीत वैज्ञानिक ग्रामिण प्रकल्प नावाने स्वयंअध्ययन परिक्षा घेवून शाळांमधून लाखो रुपयांची संपत्ती गोळा केलेली आहे.

(ह) न्यासाने Foreign Contribution Regulation Act 2010 नुसार न्यासाची नोंदणी केंद्र शासनाच्या गृह खात्याकडे करुन लाखो रुपयांच्या देणग्या गोळा केलेल्या आहेत. उपरोक्त कायदयातील कलम ३(१)(ब) नुसार कोणत्याही वृत्तपत्र मालक, संपादक, प्रकाशक, वार्ताहर यांना विदेशातून पैसा स्विकारता येत नसतानाही न्यासाचे लाखो रुपये स्विकारलेले आहेत.

(ज) न्यासाने न्यासाचे नांवे स्थावर मिळकती खरेदी केलेल्या आहेत तथापि सदर मिळकतींची नोंद धर्मादाय कार्यालयाकडे न करता आणि धर्मादाय सह आयुक्त, पुणे यांची परवानगी न घेता सदर मिळकतींची विक्री केलेली आहे.

(ट) न्यासामार्फत वेगवेगळी पुस्तके प्रकाशित केली जातात त्यांचा छपाई खर्च हिशोबामध्ये दाखविला जातो परंतू सदरची पुस्तके विक्रीतून आलेला पैसा हिशोबामध्ये दाखविल्या जात आहेत. परिणामी सदर रक्कमांचा गैरव्यवहार होत आहे.

(ठ) संस्थेमार्फत लोकांच्या धार्मिक भावना दुखावतील असे नाटय प्रयोग, एकांकीका विना परवानगी सार्वजनिक ठिकाणी दाखविले जातात त्याचा खर्च ऑडीट रिपोर्टमध्ये दाखविणेत येत आहे.

(ढ) न्यासाचे विश्वस्त नरेंद्र दाभोळकर यांचे नक्षलवादी संघटना तसेच फॉरेन मशिनरीज यांचेशी लागेबांधे असून ते लोकांच्या धार्मिक भावना दुखावणेचा प्रयत्न करीत आहेत.

वरील प्रमाणे प्राप्त झालेल्या तक्रारींबाबत न्यासाचे विश्वस्त नरेंद्र दाभोळकर यांनी तत्कालीन निरीक्षक यांचेपुढे जबाब लेखनिर्दिष्ट केलेला आहे. तथापि तक्रारदारापैकी वारंवार नोटीसा पाठवून देखील हजर झाले नाहीत मात्र तक्रारदारातर्फे श्री. राहूल कोल्हापूरे यांनी उपस्थित राहून कागदोपत्री पुरावा व माहिती दिली. तसेच तक्रारदार शिवाजी व्हटकर यांनी दिनांक ८/३/२०१६ रोजी हजर राहून चारही तक्रार अर्जाबाबत एकत्रितरित्या म्हणणे दाखल केले. तसेच सुधांशु जोशी व बापू महाराज रावकर यांनी तत्कालीन निरीक्षक यांचेसमोर जबाब व पुराव्यादाखल कांही कागदपत्रे सादर केलेली आहेत.

माहिती अधिकारी
न्यास नोंदणी कार्यालय
विभाग सातारा

प्रस्तुत प्रकरणी विश्वस्तांचा जबाब तसेच तक्रारदार यांनी सादर केलेले म्हणणे आणि या कार्यालयातील अभिलेखा व कागदपत्रे यांचा विचार करुन खालील प्रमाणे वस्तुस्थितीदर्शक एकत्रितअहवाल सादर करणेत येत आहे :-

२७।६।१६

(२) अंधश्रध्दा निमुर्लन समिती (महाराष्ट्र) १५५ सदाशिव पेठ, सातारा हा सार्वजनिक न्यास नोंदणी क्रमांक ई/४६१/सातारा या क्रमांकाने दिनांक ३०.६.१९९२ रोजी नोंदविणेत आलेला आहे. न्यास नोंदणीचे वेळी खालील प्रमाणे एकूण ०८ लोकांची न्यासाचे विश्वस्त म्हणून नोंद केलेली आहे :-

१) श्री. प्रतापराव पवार ५६८, बुधवार पेठ, पुणे.

२) श्री. निळूभाऊ लिमये, पुनम हॉटेल डेक्कन जिमखाना, पुणे.

३) श्री. निळू फुले, सोनाई, आयडीयल कॉलनी, पौंड फाटा, पुणे.

४) डॉ. राम ताकवले, यशवंतराव चव्हाण विद्यापीठ, नाशिक

५) श्री. राजा पाटील, राजाबढे चौक, बॉम्बेडाईग शोरुम, दादर मुंबई

६) श्री. सदाशिव अमरापूरकर, पंचधारा, वर्सोवा, अंधेरी, मुंबई

७) डॉ. विद्याधर बोरकर, ११ स्वप्ननंदा हौ.सोसा. कोथरुड, पुणे.

८) डॉ. नरेंद्र दाभोळकर, १५५ सदाशिव पेठ, सातारा.

(३) न्यासाचे घटनेचे अवलोकन करता न्यासाचे विश्वस्त मंडळ कमित कमी ७ व जास्तीत जास्त १३ लोकांचे असून प्रथम विश्वस्त मंडळ तहहयांत राहील, पहिल्या पांच वर्षानंतर विश्वस्त मंडळातील दोन विश्वस्त निवृत्त होतील व त्यांचे जागी उरलेले विश्वस्त बहुमताने नविन विश्वस्तांची निवड करतील व त्यानंतर याच पध्दतीने दोन विश्वस्त निवृत्त होवून नविन विश्वस्त निवडणेत येतील मात्र निवृत्त होणारे विश्वस्त पुन्हा विश्वस्त निवडणेस पात्र असतील अशी तरतूद असल्याचे दिसून येते.

(४) न्यासाच्या विश्वस्तांनी विश्वस्तांमधील बदलाबाबत खालील प्रमाणे बदल अर्ज सादर केलेले असल्याचे दिसून येते :-

१) **बदल अर्ज क्रमांक ३७८/२०१२ :-**

प्रस्तुत बदल अर्ज हा सन १९९८-९९ या कालावधीकरिता प्रताप पवार व नरेंद्र दाभोळकर यांचे पुर्ननियुक्तीबाबतचा असून दिनांक २१/३/१९९८ रोजीच्या वार्षिक सभेतील ठरावानुसार सदर बदल झाला असून प्रस्तुत बदल अर्ज २६/४/०१२ रोजी दाखल केल्याचे दिसून येते.

२) **बदल अर्ज क्रमांक ३७९/२०१२ :-**

प्रस्तुत बदल अर्ज हा सन १९९९-२००० या कालावधीकरिता राम ताकवले व नरेंद्र दाभोळकर यांचे पुर्ननियुक्तीबाबतचा असून दिनांक २२/३/१९९९ रोजीच्या वार्षिक सभेतील ठरावानुसार सदर बदल झाला असून प्रस्तुत बदल अर्ज २६/४/०१२ रोजी दाखल केल्याचे दिसून येते.

३) **बदल अर्ज क्रमांक : ३३०/२०१२ :-**

प्रस्तुत बदल अर्ज हा सन २०००-०१ या कालावधीकरिता सदाशिव अमरापूरकर व नरेंद्र दाभोळकर यांचे पुर्ननियुक्तीबाबतचा असून दिनांक २५/४/२००० रोजीच्या वार्षिक सभेतील ठरावानुसार सदर बदल झाला असून प्रस्तुत बदल अर्ज २६/४/०१२ रोजी दाखल केल्याचे दिसून येते.

४) **बदल अर्ज क्रमांक : ३८१/२०१२ :-**

प्रस्तुत बदल अर्ज हा सन २००१-०२ या कालावधीकरिता प्रताप पवार व नरेंद्र दाभोळकर यांचे पुर्ननियुक्तीबाबतचा असून दिनांक १२/३/२००१ रोजीच्या वार्षिक

सभेतील ठरावानुसार सदर बदल झाला असून प्रस्तुत बदल अर्ज २६/४/०१२ रोजी दाखल केल्याचे दिसून येते.

५) **बदल अर्ज क्रमांक : ३८२/२०१२ :-**

प्रस्तुत बदल अर्ज हा सन २००२-०३ या कालावधीकरिता सदाशिव अमरापूरकर व राम ताकवले यांचे पुर्ननियुक्तीबाबतचा असून दिनांक ११/३/२००२ रोजीच्या वार्षिक सभेतील ठरावानुसार सदर बदल झाला असून प्रस्तुत बदल अर्ज २६/४/०१२ रोजी दाखल केल्याचे दिसून येते.

६) **बदल अर्ज क्रमांक : ६५५/२००३ :-**

माहिती अधिकारी
...नोंदणी कार्यालय

प्रस्तुत बदल अर्ज हा दिनांक १/३/२००२ रोजीच्या सभेतील ठरावानुसार दिपक गिरमे, अनंत लिमये, दादासाहेब नाईकनवरे या तीन विश्वस्तांचे निवडीबाबतचा असून कार्यवाह विद्याधर बोरकर यांचा राजीनामा व निळकंठ लिमये व अनंत लिमये यांची कोषाध्यक्ष व दिपक गिरमे यांचे कार्यवाह पदाबाबतचा असून प्रस्तुत बदल अर्ज २५/९/२००३ रोजी दाखल केल्याचे दिसून येते.

२८/१/१६

७) **बदल अर्ज क्रमांक ४०१/२०१२ :-**

प्रस्तुत बदल अर्ज हा राजा पाटील दिनांक २/९/२००२ रोजी मयत झालेने दिनांक २२.४.२००३ रोजीच्या सभेतील ठरावानुसार दिनांक ७/५/२०१२ रोजी दाखल केलेला आहे.

८) **बदल अर्ज क्रमांक ३८३/२०१२ :-**

प्रस्तुत बदल अर्ज हा सन २००३-०४ या कालावधीकरिता अनंत लिमये व दिपक गिरमे यांचे पुर्ननियुक्तीबाबतचा असून दिनांक २२/४/२००३ रोजीच्या वार्षिक सभेतील ठरावानुसार सदर बदल झाला असून प्रस्तुत बदल अर्ज २६/४/०१२ रोजी दाखल केल्याचे दिसून येते.

९) **बदल अर्ज क्रमांक ३८४/२०१२ :-**

प्रस्तुत बदल अर्ज हा सन २००४-०५ या कालावधीकरिता दादासाहेब नाईकनवरे व नरेंद्र दाभोळकर यांचे पुर्ननियुक्तीबाबतचा असून दिनांक १९/७/२००४ रोजीच्या

वार्षिक सभेतील ठरावानुसार सदर बदल झाला असून प्रस्तुत बदल अर्ज २६/४/०१२ रोजी दाखल केल्याचे दिसून येते.

१०) **बदल अर्ज क्रमांक : ३८५/२०१२ :-**

प्रस्तुत बदल अर्ज हा सन २००५-०६ या कालावधीकरिता दिपक गिरमे व अनंत लिमये यांचे पुर्ननियुक्तीबाबतचा असून दिनांक १८/७/२००५ रोजीच्या वार्षिक सभेतील ठरावानुसार सदर बदल झाला असून प्रस्तुत बदल अर्ज २६/४/०१२ रोजी दाखल केल्याचे दिसून येते.

११) **बदल अर्ज क्रमांक : ३८६/२०१२ :-**

माहिती अधिकारी

प्रस्तुत बदल अर्ज हा सन २००६-०७ या कालावधीकरिता दिपक गिरमे व अनंत लिमये यांचे पुर्ननियुक्तीबाबतचा असून दिनांक २४/७/२००६ रोजीच्या वार्षिक सभेतील ठरावानुसार सदर बदल झाला असून प्रस्तुत बदल अर्ज २६/४/०१२ रोजी दाखल केल्याचे दिसून येते.

१२) **बदल अर्ज क्रमांक : ३८७/२०१२ :-**

प्रस्तुत बदल अर्ज हा सन २००७-०८ या कालावधीकरिता दादासाहेब नाईकनवरे व नरेंद्र दाभोळकर यांचे पुर्ननियुक्तीबाबतचा असून दिनांक ७/८/२००७ रोजीच्या वार्षिक सभेतील ठरावानुसार सदर बदल झाला असून प्रस्तुत बदल अर्ज २६/४/०१२ रोजी दाखल केल्याचे दिसून येते.

१३) **बदल अर्ज क्रमांक : ३८८/२०१२ :-**

प्रस्तुत बदल अर्ज हा सन २००८-०९ या कालावधीकरिता अनंत लिमये व दिपक गिरमे यांचे पुर्ननियुक्तीबाबतचा असून दिनांक २६/८/२००८ रोजीच्या सभेतील ठरावानुसार सदर बदल झाला असून प्रस्तुत बदल अर्ज २६/४/०१२ रोजी दाखल केल्याचे दिसून येते.

१४) **बदल अर्ज क्रमांक : ४१०/२०१२ :-**

प्रस्तुत बदल अर्ज हा सन २००९-१० या कालावधीकरिता दादासाहेब नाईकनवरे व नरेंद्र दाभोळकर यांचे पुर्ननियुक्तीबाबतचा असून दिनांक ३१/८/२००९ रोजीच्या

सभेतील ठरावानुसार सदर बदल झाला असून प्रस्तुत बदल अर्ज २६/४/०१२ रोजी दाखल केल्याचे दिसून येते.

१५) <u>बदल अर्ज क्रमांक : ४००/२०१२</u> :-

प्रस्तुत बदल अर्ज निळकंठ बुधाजी फुले यांचे १३.७.२००९ रोजी निधन झालेने त्यांचे नांव कमी करणेबाबत दिनांक ३१/८/२००९ रोजीचे सभेतील ठरावानुसार दिनांक ७/५/२०१२ रोजी दाखल केल्याचे दिसून येते.

१६) <u>बदल अर्ज क्रमांक : ३८९/२०१२</u> :-

...ती अधिकारी
...दणी कार्यालय

प्रस्तुत बदल अर्ज हा सन २०१०-११ या कालावधीकरिता दिपक गिरमे व अनंत लिमये यांचे पुर्ननियुक्तीबाबतचा असून दिनांक १०/८/२०१० रोजीच्या सभेतील ठरावानुसार सदर बदल झाला असून प्रस्तुत बदल अर्ज २६/४/०१२ रोजी दाखल केल्याचे दिसून येते.

२८/६/१९

१७) <u>बदल अर्ज क्रमांक : ३९०/२०१२</u> :-

प्रस्तुत बदल अर्ज हा सन २०११-१२ या कालावधीकरिता नरेंद्र दाभोळकर व दादासाहेब नाईकनवरे यांचे पुर्ननियुक्तीबाबतचा असून दिनांक ३१/८/२०११ रोजीच्या सभेतील ठरावानुसार सदर बदल झाला असून प्रस्तुत बदल अर्ज २६/४/०१२ रोजी दाखल केल्याचे दिसून येते.

१८) <u>बदल अर्ज क्रमांक : ३९१/२०१२</u> :-

प्रस्तुत बदल अर्ज हा न्यासाच्या पत्त्यातील बदलाबाबत म्हणजेच १५५ सदाशिव पेठ, सातारा बदलून परिवर्तन सहयोग हॉस्पीटल, सदर बझार सातारा असा नोंदविणेबाबत दिनांक ३१/८/२०११ रोजीच्या सभेतील ठरावानुसार सदर बदल झाला असून प्रस्तुत बदल अर्ज २६/४/०१२ रोजी दाखल केल्याचे दिसून येते.

१९) <u>बदल अर्ज क्रमांक : २९/२०१४</u> :-

प्रस्तुत बदल अर्ज हा सन २०१०-११ या कालावधीकरिता अनंत लिमये व नरेंद्र दाभोळकर यांचे पुर्ननियुक्तीबाबतचा असून दिनांक १२/११/२०१२ रोजीच्या

सभेतील ठरावानुसार सदर बदल झाला असून प्रस्तुत बदल अर्ज सन २०१४ मध्ये दाखल केल्याचे दिसून येते.

२०) <u>बदल अर्ज क्रमांक : १८४/२०१५</u> :-

प्रस्तुत बदल अर्ज हा नरेंद्र दाभोळकर यांचे निधन झालेने त्यांचे नांव कमी करुन त्यांचे जागी शैला नरेंद्र दाभोळकर यांची कार्याध्यक्ष म्हणून नोंद करणे तसेच जगन्नाथ गिरमे व अनंत लिमये यांची पुर्ननियुक्ती व अविनाश रमेश पाटील यांची विश्वस्त म्हणून निवडीबाबतचा दिनांक २१/९/२०१३ रोजीच्या सभेतील ठरावानुसार दिनांक ७/४/२०१५ रोजी शैला दाभोळकर यांनी दाखल केला आहे.

वरील प्रमाणे विश्वस्तांमधील बदलाबाबतचे बदल अर्ज या कार्यालयांत दाखल असून प्रस्तुत बदल अर्जाचे अवलोकन करता, सदरचे बदल अर्ज विलंबाने दाखल करणेत आल्याचे दिसून येते. बदल अर्जासोबत सादर केलेल्या सभेच्या इतिवृत्तामध्ये कांहि ठिकाणी खाडाखोड झाल्याचेही सकृत दर्शनी दिसून येते. शिवाय सभा संपलेनंतर पुन्हा सभेचे इतिवृत्त लिहीण्यांत आल्याचे दिसून येते. एकंदरीत बदल अर्ज वेळेत दाखल न करता विश्वस्तांनी विलंबाने व सोईस्कररित्या इतिवृत्तामध्ये दुरुस्ती करुन दाखल केले आहेत या तक्रारदारांच्या तक्रारीमध्ये तथ्य असल्याचे सकृत दर्शनी आढळून येते. तथापी सदरचे बदल अर्जांची सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सातारा यांचसमोर न्यायिक चौकशी चालू असल्याने बदल अर्जांचा गुणदोषावर न्यायनिर्णय अद्याप झालेल्या नसल्याने त्याबाबत भाष्य करणे उचित वाटत नाही.

(५) या कार्यालयातील उपलब्ध रेकॉर्ड तपासले असता, विश्वस्तांनी सन १९९२ ते २००२ अखेरची हिशोबपत्रके दिनांक १९/९/२००३ रोजी विलंबाने दाखल केलेली आहेत. तसेच सन २००३ व २००४ या वर्षाची हिशोबपत्रके दिनांक ५/३/२००४, सन २००४, २००५, २००६, २००८, २००९ व २०१० या वर्षाची हिशोबपत्रके दिनांक ३/१/२०१२ रोजी आणि सन २००७, २०११, २०१२, २०१३ व २०१४ या वर्षाची हिशोबपत्रके दिनांक १५/१०/२०१५ रोजी दाखल केल्याचे दिसून येते. प्रस्तुत हिशोबपत्रकांसोबत विश्वस्तानी विलंब माफीचा अर्ज सादर केल्याचेही दिसून येते. सदर अर्जावर मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सातारा यांनी दिनांक ५/१०/२०१५ रोजी आदेश पारीत करुन हिशोबपत्रके रुपये ५००/- विलंब शुल्क आकारुन स्विकारणेत आलेली आहेत व त्यानुसार हिशोबपत्रकाच्या नोंदी परिशिष्ट १० वर

घेण्यांत आल्याचे दिसून येते. मात्र न्यासाने हिशोबपत्रके नियमीतपणे व दरवर्षी सादर केलेली नाहीत या तक्रारदाराच्या तक्रारीमध्ये तथ्य असल्याचे दिसून येते.

(६) न्यासाने प्रत्येक वर्षी हिशोब पत्रके वर्ष संपलेपासून सहा महिन्यांचे आंत दाखल करणे आवश्यक असताना हिशोबपत्रके विलंबाने दाखल केली आहेत. तसेच न्यासाचे उद्देश मिश्र स्वरुपाचे असताना हिशोब तपासणीसाने न्यासाचे उददेश शैक्षणिक दाखवले आहेत. सन १९९२ ते २००४ अखेर हिशोबपत्रके सन २००३ साली दाखल केलेली असून लेखापाल यांनी शैक्षणिक बाब म्हणून अंशदानातून सूट दाखविली आहे. वास्तविक न्यासाकडून २ टक्के दराने अंशदानाची वसूली करणे आवश्यक होते अशी तक्रारदाराची तक्रार आहे.

याबाबत असे सादर करणेत येते की, न्यासाने सन १९९२ ते २०१५ अखेरची हिशोबपत्रके कार्यालयास दाखल केलेली आहेत. न्यासाच्या उत्पन्नावर अंशदान आकारणी करणेबाबत मा. धर्मादाय आयुक्त, मुंबई यांचेकडील पत्र जावक क्र. अंदाज/अंशदान/७३३८/२०१० दिनांक २९/११/२०१० नुसार मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील जनहित याचिका क्र. ४०/२००७, १८६४/२००७ व १७८०/२००६ मधील दिनांक २५/९/२००९ रोजीचे आदेशानुसार न्यासाकडून अंशदान वसूलीस स्थगिती देण्यांत आलेली आहे. तथापि सदर याचिकेमधील अंतिम आदेशास अधीन राहून अंशदान आकारणी करुन सध्यस्थितीत अंशदान भरुन घेणे वा त्याबाबत कार्यवाही करणे उचित वाटत नाही.

(७) न्यासाच्या उत्पन्नामध्ये सन २००४ पुढील कालावधीमध्ये मोठया प्रमाणात वाढ झालेली असून न्यासाने मोठया रक्कमाची गुंतवणूक केली आहे या तक्रारदाराच्या तक्रारीमध्ये तथ्य असल्याचे दिसून येते. न्यासाने सादर केलेल्या हिशोबपत्रकांची छाननी केली असता न्यासाने ठेवी, कायम ठेव, म्युच्युअल फंड, शेअर्स यांमध्ये कोटयावधी रुपयांच्या गूंतवणूकी केल्याचे स्पष्ट होते. तसेच त्याबाबतच्या सविस्तर तपशिल दर्शविणा-या नोंदवहया अनुसूची १० अअ ( नियम २१(२) भाग ३ प्रमाणे ठेवलेल्या नसल्याचेही दिसून येते. तसेच त्याबाबतचे विहित बदल अर्ज कार्यालयास सादर केलेले नाहीत. यावरुन न्यासाने मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम ३५ चे उल्लंघन केल्याचे सकृत दर्शनी दिसून येते.

(८) न्यासाने सादर केलेल्या हिशोबपत्रकावरुन न्यासास मोठया प्रमाणात परदेशी देणग्या मिळाल्या असल्याचे आढळून येते. तथापि प्रस्तुत न्यासाच्या विश्वस्तांचे नक्षलवादी संघटना किंवा फॉरेन मशिनरीज यांचेशी लागेबांधे आहेत अगर कसे याबाबत भाष्य करता येत नाही कारण सदरची बाब या कार्यालयाशी संबंधित नाही. तसेच नियतकालीके, वार्तापत्र, मुखपत्राबाबत संबंधित नोंदणी कार्यालयास (आरएनआय) वार्षिक अहवाल सादर करणेची बाबही या कार्यालयाच्या कार्यकक्षेत येत नसल्याने त्याबाबत भाष्य नाही. तथापि सदर साहित्याचे प्रकाशनाचे संपादक हे न्यासाचे विश्वस्त असल्याचेही दिसून येते.

(९) महाराष्ट्र अंधश्रध्दा निमुर्लन समिती संचलित वैज्ञानिक जाणिव प्रकल्प या नावाने संस्थेने उपक्रम राबविला असल्याचे दिसून येते. तसेच सदर प्रकल्पाव्दारे शाळामधून स्वयंअध्ययन परिक्षा व्दारे लाखो रुपयांची संपत्ती जमा झाल्याचे न्यासाच्या किर्द व खतावणीवरुन आढळून येते.

(१०) न्यासाची नोंद परकिय चलन नियंत्रण कायदा अन्वये केंद्र शासनाच्या गृह खात्याकडे नोंदणी असल्याचे दिसून येते. तसेच त्याव्दारे लाखो रुपयांच्या देणग्या जमा झाल्या असल्याचेही दिसून येते. तथापि त्याबाबतच्या जमा पावत्या तपासल्या असता सदर पावत्यावर एफसीआरए नोंदणी क्रमांक आढळून येत नाही किंबहूना आयकर कायदा कलम ८०(ग) अन्वये नोंदणी क्रमांकही दिसून येत नाही. मात्र अशा प्रकारे जमा झालेल्या रक्कमा न्यासाच्या उददेशा व्यतिरिक्त इतर उददेशांवर खर्च झाल्याचे दिसून येते. त्यामधून विश्वस्तांनी मोठया प्रमाणावर मानधन व अन्य संस्थांना देणग्यांचे वाटप केल्याचे आढळून येते. त्याबाबतचा ठराव केल्याचे दिसून येत नाही.

सन २००६ मध्ये महाराष्ट्र फौंडेशन इंडिया ( अमेरिका) यांनी रुपये १० लाख इतकी रक्कम नरेंद्र दाभोळकर यांचे नांवे दशकातील सर्वोत्तम कार्यक्रम म्हणून पुरस्कार स्वरुपात दिली. ती सर्व रक्कम त्यांनी न्यासास दिल्याचे नमूद केले आहे. प्रत्यक्षात चौकशीमध्ये व कागदपत्र पहाता, सन २००६ सालच्या ऑडीट रिपोर्टमध्ये अथवा किर्दखतावणीमध्ये सदरची रक्कम नमूद नसल्याचे दिसून येते.

न्यासास परदेशामधून मोठया प्रमाणांत देणग्या प्राप्त झाल्या आहेत. त्याची माहिती केंद्रीय गृह खात्याला दरवर्षी दिल्याचे संस्थेने जबाबामध्ये नमूद केले

असती तरीही सदर दिलेली माहिती व न्यासाकडील त्याबाबतची कागदपत्रे यांमध्ये तफावत असल्याचे आढळून येते.

(११) न्यासाच्या किर्द खतावणीवरुन न्यासाने इंडिका क्रूझर गाडयांवर दुरुस्तीसाठी खर्च केल्याचे दिसून येते. तथापि न्यासाने किती गाडया घेतल्या आहेत त्यांची नोंद नोंदवहीमध्ये नाही त्याचप्रमाणे स्थावर मिळकत व जंगम मिळकत याबाबतच्या अद्ययावत नोंदवहया नाहीतृ किंबहुना त्याबाबतचे बदल अर्ज कार्यालयास दाखल केल्याचे आढळून येत नाही.

(१२) न्यासाने पथनाटय, एकांकीका ,याबाबत संबंधित करमणूक कर खात्याची परवानगी घेतली किंवा कसे याबाबत माहिती उपलब्ध होत नाही.

एकंदरीत उपरोक्त परिस्थितीवरुन असे दिसून येते की,

(१) न्यासाने विश्वस्तांमधील बदलाबाबत बदल अर्ज मुदतीत दाखल केलेले नाहीत.

(२) न्यासाने हिशोबपत्रके वेळेवर व नियमीतपणे सादर केलेली नाही.

(३) स्थावर व जंगम मिळकतीच्या नोंदवहया अद्ययावत ठेवलेल्या नाहीत. तसेच त्याबाबतचे बदल अर्ज सादर केलेले नाहीत.

(४) न्यासाकडून दरवर्षी अंदाजपत्रक सादर केले जात नाही.

(५) न्यासास मोठया प्रमाणांत देणग्या मिळालेल्या असून तसेच मोठया प्रमाणांत ठेवी स्वरुपात रक्कम गुंतविलेल्या असतानाही कर्ज म्हणून कांही रक्कमा घेतल्याचे ऑडीट रिपोर्टवरुन दिसून येते. सदरच्या रक्कमा कोणाकडून व कशासाठी घेतल्या, त्याकरिता कायदयातील तरतूदीनुसार परवानगी घेतली अगर कसे याबाबत बोध होत नाही.

(६) न्यासाने ठेवी ठेवताना कलम ३५ चे उल्लंघन केल्याचे दिसून येते. कांही रक्कमा रयत सेवक सह. बँक, शामराव विटठल को-ऑप बँक अशा अनेक बँकेत ठेवणेत आल्या आहेत.

(७) हिशोबतपासणीसाने हिशोबपत्रकासोबत परदेशी देणग्याबाबतचा सविस्तर अहवाल सादर केलेला नाही.

(८) न्यासाने विविध प्रकारचे फंड निर्माण केले आहेत तथापि त्याबाबत विहीत प्रमाणपत्र सादर केलेले नाही.

(९) न्यासाने नियमबाहय अंशदानामधन सुट घेतलेली आहे.

(१३) एकंदरीत तक्रारदारांनी दाखल केलेल्या तक्रारीमध्ये तथ्य असल्याचे आढळून येते. तसेच न्यासाचे कारभारामध्ये अनियमितपणा असल्याचे दिसून येते. तथापि तक्रारदार हे प्रस्तुत न्यासाचे सभासद अथवा देणगीदार नाहीत. त्यामुळे तक्रारदार हे कायदयातील तरतूदीनुसार न्यासाचे हितसंबंधित आहेत अगर कसे हा प्रश्न निर्माण होत असला तरीही न्यासाचा कारभार कायदयातील तरतूदीनुसार व पारदर्शकपणे चालू आहे असा निष्कर्ष काढणे उचित वाटत नाही.

माहिती अधिकारी
न्यास नोंदणी कार्यालय
[illegible]

येणे प्रमाणे अहवाल सविनय सादर. . .

निरीक्षक अहवाल वाचला.
सोबतची कागदपत्रे पडताळली.
तसेच तक्रार अर्ज वाचले.
सर्व तक्रार दारांची तक्रार थोड्या फार फरकाने एकाच स्वरूपाची असल्याचे दिसून येते.
न्यासाने परदेशातून मोठ्या प्रमाणात अनुदान / देणगी मिळविली असून, विविध स्वरूपाचे निधी शासनाकडून व शाळा मध्ये गोळा करून जमा केले आहेत. व त्याचा विनियोग ज्या कारणासाठी जमा केले त्या कारणासाठी केलेला नाही. त्याचा दुरुपयोग झालेला आहे. अंधश्रद्धा निर्मूलनाचे नावाखाली मोठे प्रमाणात केले जात पण ते न्यासाचे उद्देश नाहीत असा स्वरूपाची (थोडक्यात) तक्रार असल्याचे दिसते.

२८/९/२०१८
निरीक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
सातारा विभाग सातारा

वरील तक्रार ज्या कालावधीसाठी करण्यात आली आहे त्या कालावधीतील विश्वस्त आता हयात नाहीत असे समजते. न्यास नोंदणी पासून एकही बदल अर्ज विश्वस्त किंवा मिळकत स्थावर/जंगम या बाबतचा बदल अर्ज या कार्यालयात तक्रार येई पर्यंत दाखल करण्यात आला नव्हता. आता सध्या विश्वस्तांतील बदल दाखल अर्जाचे उपलब्ध रेकॉर्ड वरून दिसते.

न्यासाचे त्या त्या वेळी ऑडिट केले किंवा नाही हा संभ्रम आहे कारण ते विलंबाने दाखल झालेले आढळतात. [illegible] त्या त्या वर्षी दाखल करण्यात आले असते तर सन २००८ पूर्वीचे हि. पत्रकांचे [illegible] नंतर संस्था/न्यासाला अंशदान भरावे लागले असते. कोणत्याही स्वरूपाचे देणगी उत्पन्न असताना वेळेत दाखल न केल्याने या कार्यालयास ही अंशदान न मिळाल्याने आर्थिक नुकसान झालेले आहे. तसेच वरील तक्रारीत हेच तक्रारदाराने अंशदानाची मागणी नमूद केलेली आहे.

न्यासाचे स्थापने पासून न्यासाचे विश्वस्त निर्णयाप्रमाणे नमूद केल्या प्रमाणे विश्वस्तांतील बदल दाखल [illegible]

न्यासाची घटना पाहिली असता घटनेप्रमाणे प्रथम विश्वस्त मंडळ पांच वर्षे राहणार असून त्यानंतर दर वर्षी २ विश्वस्त निवृत्त होणार व त्यांचे जागी उर्वरित विश्वस्त जागा भरणार असल्याचे नमूद आहे. परंतु : या प्रमाणे विश्वस्तांचे बदलपूर्वी दाखल केलेले नसलेने कार्यविवरण रेकॉर्ड प्रमाणे न्यासाचा भाग १/२ विश्वस्त दिसतात सदर सर्व मयत आहेत. दाखल बदल अर्ज मंजूर होई पर्यंत न्यासास कोणीही विश्वस्त नाहीत. ज्या व्यक्ती न्यासाचा कारभार करत आहेत त्या De facto manager आहेत. त्यांनी केलेले व्यवहारांस त्या जबाबदार राहतील.

(1) वरील वस्तुस्थिती वरुन असे लक्षात येते की, न्यासास अधिकृत कार्यकारिणी / विश्वस्त नाहीत. सबब, न्यासाचा कारभार पाहणेसाठी विधी सज्ञांची नेमणूक तातुरती होणे आवश्यक (प्रशासक म्हणून)

(2) न्यासाने दाखल केलेले ऑडिट रिपोर्ट व तक्रारदारांची तक्रारीचे स्वरुप पहाता विशेष लेखापरिक्षण होणे आवश्यक वाटते.

(3) निरीक्षकांनी अहवाल सादर करतांना / करणेपूर्वी सर्व तक्रारींचे अनुषंगाने हिशोब व त्या अनुषंगाने पावत्या बिले, खातावही, बँकेचे पासबुक इ. तपासणे आवश्यक आहे. असे असतांनी निरीक्षकांनी अहवाल मोघम दिलेला आहे. त्यांनी तक्रारींचे अनुषंगाने चौकशी केलेली दिसून येत नाही. सदस्य संख्या हजार असतांना परंतु स्थापनेचे वेळचे विश्वस्तांचा जबाब घेतलेला नाही. सबब, निरीक्षकांनी पुन्हा चौकशी करुन, तपासणी करुन अहवाल दाखल करावा. असे आदेश व्हावेत.

(4) न्यासाची अभिलेखा पहाता न्यासाचे विलीनीकरण झाले असून जो न्यास (ई-४०८) या न्यासात विलीन झाला आहे त्या न्यासाची मालमत्ता (जंगम / स्थावर) सदर न्यासात रेकॉर्डला येणे आवश्यक आहे. या बाबतही निरीक्षकांनी चौकशी केली नाही व अहवाल सादर केलेला नाही. सबब मुद्दा ३ व ४ साठी निरीक्षकांनी फेरचौकशी करुन अहवाल सादर करावा.

मान्य असल्यास वरील प्रमाणे १ ते ४ प्रमाणे आदेशास्तव सविनय सादर.

(सही)
16.07.16
अधीक्षक.

(सही)
30.08.16

शासकीय माहीती अधिकारी
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
सातारा

अधिकारी
नोंदणी कार्यालय
सातारा